॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻
ज्यांना जास्त गोष्टींची हाव असते त्यांना प्रत्येक गोष्टीची कमतरता असते.




अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक १६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

## SPOT NEWS

### नाशिकमध्ये ईडीची एकाच वेळी ९ ठिकाणी छापेमारी

● **मालेगाव** – नाशिकमधील मालेगावात ईडीने मोठी कारवाई केली असून अंमलबजावणी संचालनालय म्हणजे ईडीने मालेगावात एकाच वेळी ९ वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले आहे. अवैध बांगलादेशी प्रकरणी ही कारवाई केली जात असल्याचे म्हटले आहे. नाशिकच्या मालेगावमध्ये कथित बांगलादेशी आणि रोहिंग्यांना मोठ्या संख्येने चुकीच्या पद्धतीने जन्म प्रमाणपत्र दिले जात असल्याचा आरोप माजी खासदार आणि भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. यानंतर भारत देशातून बांगलादेशी घुसखोरांना तातडीने हाकलून काढा, अशी मागणी कोल्हापुरातील हिंदुत्ववादी संघटनांनी केली आहे. आता याप्रकरणी ईडीने मालेगावात छापेमारी केली आहे. बांगलादेशी बोगस जन्म दाखला प्रकरणात अटक करण्यात आलेले तव्वाब शेख यांच्या राहत्या घरी अंमलबजावणी संचालनालयाने शुक्रवारी २५ एप्रिल रोजी छापेमारी केली. ईडीने मालेगावात एकाच वेळी ९ वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. यावेळी बनावट जन्म आणि मृत्यू दाखले बनवण्याच्या प्रकरणात ईडीने मनी लॉड्रिंगचा गुन्हा दाखल केला. महाराष्ट्र पोलिसांनी या संदर्भात दाखल केलेल्या १६ वेगवेगळ्या तक्रारींच्या आधारावर ईडीने ही कारवाई केली आहे.

### मेधा पाटकर यांना अटक

● **नवी दिल्ली** – सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. दिल्लीचे विद्यमान नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांच्या अवामनप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. मानहानीच्या प्रकरणात त्यांना दक्षिण पूर्व दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. एलजी विनय सक्सेना यांनी मेधा पाटकर यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. मेधा पाटकर यांना दुपारी साकेत न्यायालयात हजर केले जाईल. मेधा पाटकर यांच्या वकिलाने दिल्ली उच्च न्यायालयातून त्यांची याचिका मागे घेतली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने मेधा पाटकर यांच्या वकिलाला नवीन याचिका दाखल करण्याची परवानगी दिली आहे. मेधा पाटकर यांच्या नवीन याचिकेवर आज दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

# शिर्डी विमानतळाच्या विस्तारीकरणास मंजुरी

## शिर्डी विमानतळावर दोन हेलिपॅड व आठ वाहनतळ उभारण्यास मान्यता

● **मुंबई । वीरभूमी–**
आगामी नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळ येथे दोन हेलिपॅड व ८ वाहनतळ उभारण्यास व विमानतळाचे विस्तारीकरण, अद्ययावतीकरणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता दिली. अमरावती विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचा आराखडा सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ९१ वी बैठक सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

अमरावती येथे उद्योगाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याने या ठिकाणची धावपट्टी वाढविणे आवश्यक आहे. तसेच या विमानतळापासून महसूल मिळविण्यासाठीचा आराखडा तयार करावा. मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. तसेच शिर्डी येथील विमानतळाच्या कार्गो टर्मिनलचे काम वेगाने सुरू आहे.



नाशिकपासून शिर्डी विमानतळ जवळ असल्याने नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या वेळेस हवाई मार्गेने येणाऱ्या भाविकांना शिर्डी विमानतळ सोईचे होणार आहे. त्यावेळी होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करून व नाशिक येथील विमानतळाची क्षमता लक्षात घेता शिर्डी विमानतळाचे विस्तारीकरणाच्या प्रस्तावास यावेळी मान्यता देण्यात आली. यामध्ये ८ वाहनतळे, दोन हेलिपॅड यासह टर्मिनलच्या अद्यावतीकरणाचा समावेश आहे. याचा फायदा कुंभमेळ्यादरम्यान येणाऱ्या विमाने व हेलिकॉप्टर सेवेसाठी होणार आहे.

लातूर जिल्ह्याचा सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार होत आहे. त्यामुळे लातूर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी या विमानतळाचा विकास करण्यात यावा. हे विमानतळाचा लातूरसह बीड, धाराशिव या जिल्ह्यांनाही लाभ होईल. तसेच कराड येथील विमानतळाचे काम वेगाने सुरू करून तेथे नाईट लँडिगची सुविधा निर्माण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले.

चंद्रपूर येथील विमानतळावर चार्टड विमाने उतरू शकतील अशी सुविधा तयार करण्यासाठी तेथील धावपट्टी वाढविण्यात यावी. गडचिरोली येथील विमानतळासाठी दोन ते तीन पर्यायी जागांचा विचार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी रत्नागिरी, अकोला, कोल्हापूर, नांदेड, धुळे येथील विमानतळाच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. प्रादेशिक जोडणी योजना (रिजनल कनेक्टिव्हीटी स्किम) अंतर्गत सध्या राज्यात १६ मार्गांवर विमानसेवा सुरू असून उड्डाण योजनेअंतर्गत राज्यातील आठ प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, संचालक मंडळतील सदस्य तथा वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

## देशातील २३ राज्यांना हवामान विभागाकडून अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा

● **पुणे । वीरभूमी–**
देशात पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल झाला आहे. एकीकडे देशातील अनेक भागांना उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसत आहे, तर दुसरीकडे २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

उत्तर आणि पश्चिम भारतामध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वेस्टर्न डिस्टबन्समुळे जम्मू–कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांमध्ये २५ आणि २६ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

बांगलादेश आणि आसामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे पूर्व भारतात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मिझोरम, नागालँड, या राज्यांमध्ये पुढील सात दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

तसेच या राज्यांमध्ये वादळे देखील होणार असून, या काळात ताशी ६० ते ७० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. दक्षिण भारतामध्ये तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आध्र प्रदेश आणि पाँडेचेरी या राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## बनावट नोटा चलनात आणतांना पाथर्डीतील दोघांना पकडले

● **पाथर्डी । वीरभूमी–**
तालुक्यातील पिरेवाडी येथील अंकुश वसंत आघाव व कृष्णा बबन वायभासे यांना पाटण तालुक्यातील मल्हारपेठ येथे बनावट नोटा देवुन सामान खरेदी करताना व्यापाऱ्यांनी पकडले होते. त्यांना चांगला चोपही दिला. २२ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता ही घटना घडली. पोलिस येताच अंकुश आघाव हा गर्दीतुन पळुन जाण्यात यशस्वी झाला. आघावचा पाठलाग केला मात्र तो पसार झाला आहे.

मल्हारपेठ (पाटण) येथील पोलिस अधिकारी पिरेवाडी येथे येवुन तपास करीत आहेत. अंकुश वसंत आघाव व कृष्णा बबन वायभासे हे तालुक्यातील पिरेवाडी येथील रहीवासी आहेत. अंकुश वसंत आघाव याच्यावर पाथर्डी पोलिस ठाण्यात गंभीर दुखापत करणे, पळवुन नेहणे, हाणामारी करणे असे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्या गुन्ह्यात तो फरार आहे. अंकुशने आहील्यानगर येथे त्याच्या भावाच्या नावाने घर घेतलेले आहे. तो पाथर्डीत येत नाही. नगरवरुन सावरगाव मार्गे माणिकदौंडी व पिरेवाडी येथे जातो. कृष्णा वायभासे हा पोलिस भरतीचा अभ्यास करीत होता. मात्र तो अंकुशच्या संपर्कात आला. त्यांच्या सोबत दोन महीन्यापासुन तो गावातुन बाहेर आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी मल्हारपेठमधे त्या दोघांना १००, २०० व ५०० रुपयाच्या बनावट नोटा व्यापाऱ्यांना देताना पकडले गेले. व्यापाऱ्यांच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर त्यांनी दोघांना पकडले. चांगलेच चोपले आणि पोलिसांना फोन करुन बोलविले. पोलिस येताच अंकुश आघाव गर्दीतुन पळाला. कृष्णा वायभासेला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडुन चाळीस हजाराच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. अंकुशचा शोध घेत पाटणचे पोलिस अधिकारी व कर्मचारी पाथर्डी पोलिस ठाण्यात आले होते. येथील पोलिसांच्या मदतीने पिरेवाडी येथे अंकुश आघावच्या घरावर पोलिसांनी गुरुवारी रात्री उशीरा छापा मारला. अंकुश मात्र पोलिसांना भेटला नाही. त्याच्या घरातील लोकांशी पोलिसांनी चौकशी केली आहे.

पिरेवाडी अंकुश आघाव व त्याचे सहकारी गेल्या अनेक दिवसापासुन बनावट नोटा चलनात आणण्याचे काम करीत असल्याची चर्चा पिरेवाडी गावासह माणिकदौंडी परीसरात आहे. अंकुशवर अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याला पोलिसांनी कसे पकडले नाही. पाथर्डीच्या भाजी बाजारात अनेकांशी अकुंशचा संबध आल्याची चर्चा देखील पिरेवाडीचे ग्रामस्थ करीत आहेत. पाथर्डी पोलिस याबाबत अनभिज्ञ कसे याचीही चर्चा सुरु आहे. पाथर्डी पोलिसांना याबाबत काही माहीतीच नाही की माहीती असुनही पोलिस यंत्रणा एवढी शांत कशी याचीही चर्चा पिरेवाडीचे ग्रामस्थ खमंगपणे करीत आहेत.

# जलजीवन योजनेच्या सर्व कामाची चौकशी करा

## चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा

● **नगर । वीरभूमी –**
अकोले तालुक्यातील जलजीवन योजनेच्या कामांची चौकशी करण्या साठी राज्य शासनाने चौकशी समिती नेमुन त्या मार्फत तालुक्यात सुरू असलेल्या जलजीवन योजनेच्या सर्व कामांची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा समाजसेवक अनंत महादु घाणे सह दिनेश शहा, सरपंच ढवळा भांगरे, काळु जाधव, देवराम भांगरे, पंढरी पेढेकर, सुनील पवार, तुकाराम खाडे, रामदास पिचड यांचे सह खिरविरे येथे परिसरातील गावांतील पदाधिकारी व ग्रामस्थांच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला आहे.

अकोले तालुक्यात सध्या शेकडो कोटी रुपये खर्चाचे हर घर जल या केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची कामे सुरू आहेत.काही कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून तर काही कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरू आहेत. प्रत्येक व्यक्तीला स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने मोदी सरकारने लोकसभा निवडणुकांच्या अगोदर सदर योजनांना मंजुरी देऊन कामे सुरू झाली. परंतु आजपावेतो तालुक्यातील एकही काम पूर्ण होऊन जनतेला पिण्यासाठी शाश्वत पाणी मिळाल्याचं ऐकीवात नाही. प्रत्येक गावात कामासंदर्भात ग्रामस्थांच्या खूप तक्रारी आहेत. त्यात निकृष्ट दर्जाचे होत असलेल्या पाण्याच्या टाक्यांची कामे तसेच पाणी वितरण आणि पुरवठा यासाठी असलेली पाइपलाईन आवश्यक त्या खोलीत न गाडणे, तसेच यासाठी वापरण्यात येणाऱ्या मटेरियलची गुणवत्ता, बांधकामासाठी कमीतकमी पाण्याचा वापर तर ब–याच ठिकाणी वरचेवर पाइपलाइन गाडली गेली आहे अशा अनेक प्रकारच्या तक्रारी आज मंगळवार दिनांक २२ मार्च रोजी खिरविरे येथे जमलेल्या अनेक गावांतील कार्यकर्त्यांकडून समाजसेवक अनंत घाणे यांच्याकडे करण्यात आल्या होत्या.सदर योजना फक्त ठेकेदार आणि अधिकारी यांनी आपले खिसे भरण्यासाठी मंजूर करून आणल्या आहेत का असाही प्रश्न नागरीक विचारत आहेत सदर कोट्यवधी रुपयांच्या या योजनेचा लाभ जर जनतेला झाला नाही तर शासनाचा पैसा वाया जाऊन पुढे अनेक वर्षे सदर गावांतील योजनांना मंजुरी मिळणार नाही.यासाठी सरकारी कार्यालयात बसून योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेच्या वतीने केलेल्या आरोपांची शहानिशा करून दर्जेदार काम करुन नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा सुटेल याकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. सरकारी आकडेवारीनुसार अनेक ठिकाणी काम



८० टक्क्यापर्यंत पुर्ण झाल्याचं दाखवलंय परंतु प्रत्यक्षात काम तेवढं झालंच नसल्याचा स्थानिक नागरिकांचा आरोप आहे. खिरविरे परिसरातील खिरविरे, एकदरे, पिंपळदरावाडी, बिताका, जायना वाडी, मानमोडी, कोकण वाडी, समशेरपुर, केळी रुम्हनवाडी, तसेच इतरही गावातील नागरिकांनी सदर योजनेच्या कामाची शासनाच्या चौकशी समितीकडुन तातडीने चौकशी व्हावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तसेच या भागात पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली असून नागरिकांना तातडीने टँकर द्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी केली आहे.

# SPOT NEWS

## भगवान विष्णू आणि शंकर यांच्यात भेद केल्यास अध: पतन : शिवाजी महाराज



● **कोपरगाव । वीरभूमी-**

भगवान विष्णू आणि शंकर यांच्या कोणताही भेद नसून दोन्ही एकच आहेत. जर भक्तांनी भेद मानला तर त्यांचे अध: पतन होते असे प्रतिपादन हरिभक्त परायण शिवाजी महाराज भालुरकर यांनी केले आहे. राहाता तालुक्यातील शिंगवे येथे महाराष्ट्रातील एकमेव असलेल्या श्री हरिहर मूर्ती प्रतिष्ठापना निमित्ताने सुरू असलेल्या कीर्तन महोत्सवाचे प्रथम पुष्प गुंफताना ते बोलत होते. अभंगाचे निरूपण करताना पुढे म्हणाले की दोघांमध्ये सारखेपणा आहे, कोणतही भेद नाही. हरी आणि हर या दोघांमध्येही हरण करणे ही समान क्रिया आहे. भक्तांचे चित्त हरण करणे, दोष, पाप हरण करणे या दोन्हीही क्रिया दोघांमध्ये दिसून येतात. हर व हरी यामध्ये भेद करून वाद निर्माण करू नये. भगवान शंकर भोळे आहेत तर विष्णू अतिशय चतुर आहे. गोडी आणि साखर जशी एकच आहेत तसेच हरी हर एकच आहेत. यावेळी आचार्य भगवान महाराज शास्त्री, साई सुरेशानंद भारती, गणेश महाराज शास्त्री, शिवाजी महाराज ठाकरे, नामदेव महाराज तळेकर, रामभाऊ म. चौधरी महाराज, शुभम महाराज काशीद, ज्ञानेश्वर महाराज गुंजाळ, वसंत महाराज भाकरे आदींसह शिंगवे, सडे, वारी, कान्हेगाव, रस्तापूर, पिंपळवाडी, भोजडे आदी गावातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## आ. आशुतोष काळेंचा कोपरगावात सोमवारी जनता दरबार

● **कोपरगाव । वीरभूमी-**

सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात येणाऱ्या अडी-अडचणी समजून घेवून त्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आ.आशुतोष काळे यांनी जनता दरबार सुरु केल्यामुळे सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक होत असल्यामुळे सोमवार (दि.२८) रोजी आ.आशुतोष काळे दुपारी ०२:०० वा. कोपरगाव तहसील कार्यालयात जनता दरबार घेणार आहेत अशी माहिती आ.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे. मतदार संघातील अनेक नागरिकांचे शासकीय कार्यालयांमध्ये विविध प्रकारची कामे अडलेली असतात. सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात जोपर्यंत आपले काम पूर्ण होत नाही तोपर्यंत चकरा माराव्या लागतात. सुरुवातीला जनता दरबारात एकाच वेळी सर्व विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांना बोलावून घेतले जात होते. परंतु समस्या घेवून येणाऱ्या नागरीकांची होणारी गर्दी पाहता त्यामध्ये अधिकची सुसूत्रता यावी यासाठी आ.आशुतोष काळे यांनी सर्वच शासकीय कार्यालयातील अधिकारी एकाच वेळी न बोलविता टप्या टप्याने विविध विभागाचे अधिकारी जनता दरबारात बोलविले जावून नागरिकांच्या समस्या सोडविल्या जात आहेत. त्याप्रमाणे सोमवार दि.२८ रोजी दुपारी २.०० वाजता तहसील कार्यालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मृद व जल संधारण, जल नि:सारण व जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग आदी विभागाच्या समस्या सोडविण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन कारण्यात आले आहे. वरील विभागाबाबत ज्या नागरिकांचे प्रश्न , अडचणी असतील ते प्रश्न व अडचणी सोडवण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. नागरिकांनी आपल्या अडचणी व तक्रारी लेखी स्वरूपात मांडाव्या असे आवाहन ना.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# महसुलमंत्र्यांकडून शिव-पाणंद रस्ता चळवळीच्या मागण्या मान्य

### शरद पवळे यांची माहिती । मंत्रालयात महसुलमंत्री कार्यालयात दि. २४ एप्रिलला रोजी झाली बैठक

● **श्रीगोंदा । वीरभूमी-**

शेत तिथे रस्ता, गाव तिथे समद्धी या जनजागृती जनआंदोलनाच्या माध्यमातुन शिव हा पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटिल यांच्या नेतृत्वाखाली खाली शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने शेतरस्तांच्या प्रश्नावर आझाद मैदान येथे पुकारलेल्या अंदोलनाची राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दखल घेत मंत्रालय मुंबई येथील महसुलमंत्री कार्यालयात दि.२४ एप्रिलला राज्यातील संबंधित विभागांसमवेत बैठक घेतली. चळवळीच्या सर्व मागण्यांसदर्भात चर्चा पार पडली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व प्रश्न समजावून घेत सर्व मागण्या मान्य केल्या आहेत.

या बैठकीला विडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे हे चर्चेत सहभागी झाले होते. दरम्यान विशेष कार्यकारी अधिकारी सचिन ढोले यांनी विशेष सहकार्य केले. समवेत संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या चर्चेनंतर विविध मागण्या मान्य झाल्या. त्या याप्रमाणे



राज्यातल्या सर्व रस्त्यांना नंबर देवून शिवहा पाणंद शेतरस्त्यांच्या हद्द निश्चित करून सहा महिन्यात दगडी नंबरी लावण्यात येणार. औरंगाबाद हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे ६० दिवसांत राज्यातील सर्व तहसीलदारांना शेतरस्ते खुले करण्याचे आदेश देऊन दिरंगाई केल्यास तहसिलदारांना १००० रू. दंड जाहीर. राज्यातल्या प्रत्येक ग्रामपंचायतींना हद्द निश्चित झालेले शेतरस्ते खुले करण्यासह सपाटीकरणाचे आदेश देणार. शेतरस्त्यांसाठी खाजगीसह व शासकीय मोजणीसाठी पोलिस संरक्षण मोफत. सर्व शेतरस्ते खुले करणाऱ्या ग्रामपंचायतींना विशेष पुरस्कार. वाटपपत्रात शेतरस्त्यांचा उल्लेख करूनच वाटपपत्र केले जाणार. शेतरस्ते बंद करणाऱ्यांना होणार तातडीची शिक्षा. नकाशावर लांबी, रुंदी नमुद करून वाजे उल बुक मध्ये रस्त्यांच्या नोंदी होणार.

> राज्यातील नकाशावरील शिव - पाणंद शेतरस्त्यांच्या हद्द निश्चित करून सहा महिन्यांत दगडी नंबरी लावुन ग्रामपंचायतींनी शेतरस्ते सपाटीकरण करून झाल्यानंतर लगेच विशिष्ट निधी मंजूर करून राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार शेतरस्ते करून देणार.
>
> **- ना. चंद्रशेखर बावनकुळे,** महसुलमंत्री

दर ३ महिन्याला तहसिल कार्यालयात रस्ता अदालत होणार.

अशा विविध विषयांवर चर्चा पार पडत शेतकऱ्यांच्या उज्वल भविष्याचा विचार करत चळवळीसमवेत सन्मानपूर्वक बैठक घेत शेतकऱ्यांना न्याय देण्याचा ऐतिहसिक निर्णय बैठकीत घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य शिव- पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी राज्यभरातील शेतकऱ्यांच्या वतीने सरकार प्रशासनाचे आभार मानले.

## देवनाथ फाउंडेशनकडून भगवानगड परिसरातील पाणवठ्यात सोडले पाणी



● **पाथर्डी । वीरभूमी-**

२२ एप्रिल ते १ मे या कालावधीत महाराष्ट्र राज्य पर्यावरण विभाग अंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत भगवानगड परिसरातील देवनाथ फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने वन्यजीवांसाठी पाणवठ्यावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करत या सामाजिक सेवेचा उपक्रम राबविण्यात आला.

उन्हाच्या त्रासाने निसर्गातील जैव साखळीतील महत्त्वाचे घटक असलेले पशु-पक्षी अन्न पाण्यावाचून मृत्यूमुखी पडतात. हीच गरज ओळखून 'जागतिक वसुंधरा दिन' अभियानाच्या निमित्ताने देवनाथ फाऊंडेशन प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांच्या वतीने भगवानगड परिसरातील डोंगर माथ्यावर असलेल्या वन्यजीवांसाठी पाणवठ्यावर टँकरद्वारे पाण्याची सोय करण्यात आली.

या उपक्रमातून वसुंधरेच्या संरक्षण, संवर्धनासाठी निसर्गस्नेही विचार रुजण्यास मदत होईल, असा विश्वास या निमित्ताने डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांनी व्यक्त केला.

यावेळी दादासाहेब खेडकर, सचिन ढोले, अशोक आव्हाड, अमोल होरणे, रमेश अंदुरे, महादेव जगताप, कपिल बांगर, अनिल जवरे, मयुर काळुसे, दिपक ढाकणे, मारुती नागरे, नितीन जवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## निवडुंगे ग्रामस्थांचा पंचायत समितीसमोर बैठा सत्याग्रह

### अतिक्रमण हटविण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित

● **पाथर्डी । वीरभूमी-**

तालुक्यातील निवडुंगे येथील सर्वे नंबर ६९१ मधील अतिक्रमणाबाबतचा वाद गेल्या दोन महिन्यांपासून धुमसत असून तेथील छोटी मंदिरे, बारव याकडे दुर्लक्ष करत कब्रस्तान च्या नावाखाली मोठी जागा बळकावली. अशा नोंदी सिटीसर्वे कडून रद्द करण्यात आल्या तरी पंचायत समितीकडून अतिक्रमण हटवण्याबाबत कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालया पुढे बैठा सत्याग्रह सुरू केला. गटविकास अधिकाऱ्यांनी पत्र दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.



याबाबत माहिती अशी, की निवडुंगे येथे सर्वे नंबर ६९१ मधील जागेमध्ये प्राचीन जुनी छोटी मंदिरे आहेत. तेथे कब्रस्तान अशी नोंद दाखवून राजरोस अतिक्रमण झाल्याबाबत ग्रामस्थांनी प्रांताधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. यापूर्वीच्या आंदोलनानंतर सिटीसर्वे विभागाकडून नजरचुकीने नकाशा चुकीचा देण्यात आल्याचे सांगून तशी नोंद रद्द करण्यात आली आहे. असे पत्र मिळाले प्रत्यक्षात अतिक्रमणांचा विषय गाव पातळीवर धुमसतच राहिला. संबंधितांना तेथे येण्यास मज्जाव करावा अशी मागणी यापूर्वी करण्यात आली होती. त्याकडे पंचायत समिती प्रशासनाने फारसे गांभीर्याने बघितले नाही. या धोरणाविरुद्ध सामूहिक आवाज उठवत ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले. यानंतर गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, विस्तार अधिकारी दत्तात्रय रानमळ आदीं कर्मचाऱ्यांनी चर्चा केली. आंदोलनामध्ये आसाराम ससे, नवनाथ गोंधणे, हरिभाऊ मरकड, शंकर मरकड, कचरू मरकड, संतोष जाधव, विकास ससे, गोरक्ष मरकड, प्रवीण कोकणे, सतीश सावंत, आदींसह ग्रामस्थ सहभागी झाले. गटविकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्रामध्ये सर्वे नंबर ६९०, ९१, ९२ याची मोजणी करून हद्द निश्चित होईपर्यंत तेथे कुठलाही व्यवहार करू नये. अशा आशयाचा फलक तात्काळ लावण्यात येईल असे आश्वासन दिल्यानंतर तेथील तणाव निवळला व आंदोलकांनी ही आंदोलन मागितले.

# बस डेपो, व्यापारी संकुल, चार्जिंग स्टेशनचे काम शीघ्र गतीने पूर्ण करा

### आ. आशुतोष काळे । कोपरगाव आगारामध्ये नवीन पाच बसचे पुजन

● **कोपरगाव । वीरभूमी-**

कोपरगाव शहरातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांसाठी आशेचा किरण असलेल्या कोपरगाव शहरातील बस डेपो, व्यापारी संकुलाबरोबरच चार्जिंग स्टेशनचे काम शीघ्र गतीने पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव आगार प्रमुख अमोल बनकर यांना दिल्या आहेत.

कोपरगाव शहराच्या एस.टी. बस आगारामध्ये सुरु असलेल्या वर्कशॉप, चार्जिंग स्टेशन व व्यापारी संकुलाची आ. आशुतोष काळे यांनी पाहणी करून कामाचा आढावा घेतला. यावेळी कोपरगाव बस आगाराला मिळालेल्या नवीन पाच बसचे आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात येवून लोकार्पण करण्यात आले.

यावेळी सुरु असलेल्या कामाबाबत सूचना करतांना ते बोलत होते. यावेळी आ. आशुतोष काळे म्हणाले की, व्यापारी संकुलाच्या कामाला



गती देवून हे व्यापारी संकुल लवकरात लवकरात जनसेवेत रुजू करा. जेणेकरून छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना या व्यापारी संकुलाच्या माध्यमातून लवकरात लवकर व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील. पुढील वर्षी नासिक येथे होणाऱ्या कुंभ मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर कोपरगाव बस स्थानकातून नासिक येथे जाणाऱ्या येणाऱ्या प्रवासी बांधवांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागणार नाही याची काळजी घेवून सुरु असलेली कामे वेळेत पूर्ण करा. भविष्यात इलेक्ट्रिक बस ची संख्या वाढणार आहे त्यामुळे जास्तीत जास्त बस कोपरगाव डेपोत चार्जिंगसाठी येणार असून निश्चितच बसची संख्या वाढल्यामुळे प्रवाशांची संख्या वाढणार आहे व त्याचा परिणाम कोपरगावच्या व्यवसाय वाढीसाठी पूरक ठरणार आहे. त्यामुळे कोपरगाव बस डेपो आगारात सुरु असलेल्या बस चार्जिंग स्टेशनचे काम देखील लवकरात लवकर पूर्ण करा. कोपरगाव बस डेपोला पाच नवीन बस मिळाल्या असून अजून पाच बस मिळणार आहे त्यामुळे प्रवाशांच्या अडचणी सुटण्यास मदत होणार असून यापुढील काळातही प्रवाशांच्या अडचणी सोडवण्यासाठी कोपरगाव बस आगाराला सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी आगार प्रमुख अमोल बनकर, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता धनंजय धांडे, सहाय्यक अभियंता अतुल खंदारे, महापारेषणचे उपकार्यकारी अभियंता विजय गोसावी, सहाय्यक अभियंता अशोक राख, स्थापत्य शाखेचे कनिष्ठ अभियंता संजय दरेकर, विद्युत विभागाचे कनिष्ठ अभियंता एम.एम. संगमनेरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

## धनादेशाचा अनादर; आरोपीस ६ महिने कारावासाची शिक्षा

● **नगर । वीरभूमी-**

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेस त्यांच्या थकित कर्ज रकमेपोटी दिलेल्या ३८ हजार ८१ रुपयाचा धनादेश वटला नाही. म्हणून श्रीरेणुकामाता मल्टीस्टेट संस्थेने जिल्हा न्यायालयात रवींद्र तानाजी दराडे (रा. खुरपे बोळ, बार्शी, जि. सोलापूर) याचे विरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीवर अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. बी. दिवाकर यांनी आरोपीस दोषी धरून त्यास सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

रवींद्र दराडे याने श्रीरेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटीच्या बार्शी शाखेतून ३० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. सदर कर्ज थकित झाले. सदर कर्जाच्या परतफेडीपोटी आरोपीने बार्शी शाखेचा बँक ऑफ इंडिया यांचा ३८ हजार ८१ रुपयाचा धनादेश फिर्यादी संस्थेच्या नावे दिला होता. सदर धनादेश न वटल्यामुळे श्रीरेणुकामाता मल्टीस्टेट संस्थेने अहमदनगर येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या कोर्टात आरोपी दराडे विरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

सदरच्या केसचे कामकाज अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्या. श्री. व्ही. बी. दिवाकर यांच्यासमोर चालले. या केसमध्ये फिर्यादीतर्फे संस्थेचे धीरज आव्हाड यांची दिलेली साक्ष ग्राह्य मानून मे. कोर्टाने आरोपी रवींद्र दराडे यास सहा महिने कारावासाची शिक्षा ठोठावली.

फिर्यादीतर्फे ॲड. तेजस उदास यांनी काम पाहिले. त्यांना धनलक्ष्मी नायडू यांनी सहकार्य केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयात सोमवारी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यशाळा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये येत्या सोमवारी रोजी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये पाथर्डी तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचा सहभाग असणार आहे. कार्यशाळेच्या निमित्ताने नवीन शैक्षणिक धोरणातील बदल तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला लागू होत असलेले धोरण याविषयी चर्चा करण्यात येणार आहे. कार्यशाळेचे उद्घाटन पाथर्डी पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी शिवाजी कांबळे यांच्या हस्ते व पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सदर कार्यशाळेत हभप. गणेश महाराज बडे, प्रा. डॉ. मंगेश वाघमारे, डॉ. जयश्री खेडकर यांचे व्याख्यान होणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बदलते प्रवाह या विषयाचा उहापोह या कार्यशाळेत होणार आहे. या कार्यशाळेत अधिकाधिक शिक्षकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणचे महाविद्यालय समन्वयक डॉ. अशोक कानडे यांनी केले आहे.

## पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा मुस्लिम समाजाकडून निषेध



**● नगर । वीरभूमी–**

काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा शहरातील मुस्लिम समाजाच्या वतीने तीव्र निषेध नोंदविण्यात आला. या घटनेत बळी पडलेल्या निष्पाप २६ नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शुक्रवारी (दि. २५ एप्रिल) दुपारी सर्जेपूरा येथील तांबोळी कब्रस्तान मरकज येथे नमाज अदा केल्यानंतर श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी मुस्लिम समाजातील नागरिकांनी काळ्या फिती लावून या भ्याड हल्ल्याचा विरोध दर्शवला. या श्रद्धांजली सभेला अब्दुल सलाम खोकर, हाजी मन्सूर शेख, मौलाना अफजल, हाजी अकिल शेख, हाजी रऊफ टायरवाले, हामजा शेख, शाहरुक शेख, अब्दुल रेहमान सौदागर, आसिफ शेख, साजिद शेख, रफिक वेल्डर आदींसह शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी एकत्र येत दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी करुन या भ्याड हल्ल्यात मयत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांसोबत सहवेदना व्यक्त केली. अब्दुल सलाम खोकर म्हणाले की, दहशतवादाचा कोणताही धर्म नसतो. हे माणुसकीच्या तत्वांना पायदळी तुडवणारे कृत्य आहे. बायसरनमध्ये घडलेली घटना ही संपूर्ण मानवजातीच्या विरोधात आहे. अशा भ्याड हल्ल्यांमुळे समाजात दहशतीचं वातावरण निर्माण होतं. केंद्र सरकारने अशा प्रवृत्तींना उखडून टाकण्यासाठी कठोर पावलं उचलली पाहिजेत. इस्लाम धर्म कुठल्याही निरपराध व्यक्तीच्या हत्येची परवानगी देत नाही. धर्माच्या नावावर दहशतवाद करणाऱ्यांचा इस्लामशी काहीही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले. हाजी मन्सूर शेख म्हणाले की, ईस्लाम हा शांती, प्रेम, सहिष्णुता व मानवी मूल्यांचा धर्म आहे. कोणत्याही परिस्थितीत दहशतवादाचे समर्थन इस्लाम करत नाही. धर्मविरोधातील हे कृत्य असून, निष्पाप लोकांचे प्राण घेणाऱ्यांना मानवी समुदायात जागा नाही. मुस्लिम समाज या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि अशा प्रवृत्तीच्या विरोधात सर्व भारतीय खंबीरपणे उभे असल्याचे त्यांणी सांगितले.

# गोपाळ मोटे यांनी सामाजिक सलोखा बिघडवू नये

### शेख महंमद बाबा यांचे वंशज आमीन शेख यांचा आरोप

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

नवीन वक्फ सुधारणा २०२५ च्या कायद्यानुसार वक्फ बोर्डबाबत निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असल्याने वक्फ नोंदणी रद्द करणेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. तर स्वतः आ. विक्रम पाचपुते यांनी ही वक्फ नोंदणी रद्द करण्यासाठी मुख्यमंत्र्याकडे प्रस्ताव दिला असुन झालेली प्रक्रिया अधिकृत असुन तथाकथीत यात्रा कमेटीचे गोपाळ मोटे नागरिकांची दिशाभूल करुन जातीय तेढ निर्माण करीत असल्याचा आरोप शेख महंमद बाबा यांचे वंशज ट्रस्टचे अध्यक्ष आमीन शेख यांनी केला आहे.

सन १९९७ साली ट्रस्टचे नाव बाबांचे वंशज विश्वस्त, शेख मलंगबुवा हाफीजबुवा, हुसेन कमालबुवा शेख, नबीलाल बाबा शेख यांनी स्वतः धर्मादाय आयुक्त अ.नगर यांच्याकडे शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट या नावासाठी स्किम दाखल केली. सदर स्कीमला मा. धर्मादाय आयुक्त अ.नगर यानी १९९९ साली मान्यता दिल्याने शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट असे नाव झाले. मी ट्रस्टचे नाव बदलले हा माझेवर होणारा आरोप साफ खोटा आहे.

सन २००८ साली शेख महंमद बाबा यांचा इतिहास भावीकांच्या मागणीनुसार पुस्तक रुपाने प्रकाशीत केल्याने मोटे यांनी भावना भडकवल्याच्या नावाखाली आम्हालाच मारहाण करुन आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केले. व बाबांचे वंशज, पुजारी, विश्वस्तांची निवसस्थाने खाली केली त्यामुळे देवस्थान व देवस्थानच्या जमीनी सुरक्षित राहण्यासाठी बोर्डकडे नोंदणी केली होती.

आमचे राहते घरातील सामान बाहेर रस्त्यावर फेकुन आम्हला बेघर करण्यात आले. त्या विरुद्ध आम्ही श्रीगोंदा न्यायालयात न्याय मागीतला. मा. न्यायालयाने तथाकथीत यात्रा कमेटीचे गोपाळ मोटे वगैरेना शेख महंमद बाबा ट्रस्टच्या स्थावर अगर जंगम मिळकती संबंधी त्यांच्या वापरास अगर हक्कास बाधा आणणारे कोणतेही कृत्य करु नये, असा मनाई आदेश दि. ११/२/२०१० रोजी दिला आहे. तो आदेश आज ही कायम आहे.

शेख महंमद बाबा यांनी हिंदू मुस्लीम ऐक्याचे व अखील मानव जातीचे कल्याणाचे, संमतेचे कार्य केले आहे. शेख महंमद बाबांचा उत्सव पुर्वी तीन दिवसाचा होता गोपाळ मोटे यांनी स्वतः आत्मपरीक्षण करावे की, बाबांचा इतिहास बदलण्याचा व देवस्थान ताब्यात घेण्याचा प्रयत्न कोण करीत आहे.

सन १९९६ साली गोपाळ मोटे वगैरे यांनी शेख महंमद बाबा ट्रस्ट बरखास्त करावा त्यांची वंशपरंपरा वहीवाट रद्द करावी व त्या ठिकाणी आमची विश्वस्त म्हणून नेमणूक करावी असा अर्ज धर्मादाय आयुक्त अ.नगर यांच्याकडे केला होता. तो अर्ज धर्मदाय आयुक्त अ.नगर यांनी फेटाळला तसचे श्री शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठाण यात्रा समिती नोंदणी अर्ज ६/२००३ सा.धर्मादाय आयुक्त यांनी फेटाळला.



सन २०२२ साली गोपाळ मोटे व इतर २१ जण यांनी श्री संत शेख महंमद महाराज देवस्थान यात्रा उत्सव प्रतिष्ठाणची नोंदणी केली. या प्रतिष्ठाणचा आणि शेख महंमद बाबा देवस्थानचा कसलाही कायदेशीर सबंध नाही, मोटे यांचे सामाजीक प्रतिष्ठाण आहे. कुंभार गुल्ली येथील मिळकत क्र.२०२ ही त्यांची जागा आहे जनतेची दिशाभूल करुन मोटे वारंवार शेख महंमद बाबा ट्रस्टच्या कारभारात हरकत अडथळा निर्माण करत असल्याने शेख महंमद बाबा ट्रस्टचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्याबाबत ट्रस्टच्या वतीने पुणे धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अपील दाखल केले असुन त्यामध्ये पुणे धर्मादाय आयुक्त यांनी केलेल्या निर्णया विरुद्ध गोपाळ मोटे यांनी छत्रपती संभाजीनगर हार्यकोर्टात याचिका दाखल केली आहे.

> नवीन वक्फ सुधारणा २०२५ च्या कायद्याअंतर्गत केलेली प्रक्रिया कायदेशीर आहे त्यात तांत्रीक बाब उपस्थित करुन जनतेचा गैरसमज करु नये. तुम्हाला सत्य मानने जड जातय आणि तुमचा जातीय आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचा उद्देश आहे. जो शेख महंमद बाबांना कधीही मान्य होणार नाही. गावाशी खेळणाऱ्यांचा महंमद बाबा बंदोबस्त केल्या शिवाय राहणार नाही.
>
> **– टिळक भोस**

## पाथर्डी तालुक्यातील या ग्रामपंचायतीमध्ये येणार महिलाराज

**● पाथर्डी । वीरभूमी–**

लोकनियुक्त महिला सरपंच आरक्षणाच्या सोडतीसाठी तहसील कार्यालयामध्ये विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, दादासाहेब वावरे आदींच्या उपस्थितीत व विविध गावच्या कार्यकर्त्यां समक्ष शाळकरी मुलीच्या हाताने आरक्षणाच्या चिठ्ठ्या काढण्यात आल्या.

तालुक्यातील सोमठाणे खुर्द, आलनवाडी, घाटशिरस व तोंडोळी येथील सरपंच पद अनुसूचित जाती स्त्री या प्रवर्गासाठी तर अंबिका नगर येथील पद अनुसूचित जमाती स्त्री राजीव प्रवर्गासाठी असेल.

नागरिकांच्या मागास प्रवर्ग स्त्री राखीव साठी शंकरवाडी, देवराई, अकोला, जवखेडे खालसा, हनुमानटाकळी, चितळी, मढी, दुलेचांदगाव, खांडगाव, मोहोजखुर्द, भुतेटाकळी, पत्र्याचा तांडा, मोहोज बुद्रुक, कामत शिंगवे, चिचोंडी. तर सर्वसाधारण स्त्री राखीवसाठी टाकळीमानुर, आडगाव, आगासखंड, भालगाव, भारजवाडी, भिलवडे, चिंचपूर इचदे, चितळवाडी, डांगेवाडी, ढाकणवाडी, डोंगरवाडी, एकनाथवाडी, घुमटवाडी, गितेवाडी, जांभळी, करोडी, कौडगाव, खरवंडी कासार, कोल्हार, लांडकवाडी, मालेवाडी, निवडुंगे, पाडळी, पागोरी पिंपळगाव, पिंपळगाव टप्पा, रांजणी, रेणुकाई वाडी, शिराळ, शिरापूर, तीनखडी, वडगाव, राघो हिवरे, सातवड, खेरडे, पिरेवाडी असे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित झाले आहे.

या सोडती सन २०२५ ते २०३० या कालावधीमध्ये निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतीसाठी लोकनियुक्त सरपंच पदासाठी असे आरक्षण लागू असणार आहे.

## मिडसांगवी येथील सालसिद्ध बाबांचा उद्यापासून यात्रोत्सव

**● पाथर्डी । वीरभूमी–**

जागृत देवस्थान असलेल्या मिडसांगवी गावचे ग्रामदैवत सालसिद्ध बाबा यांची यात्रा उद्यापासून तीन दिवस भरणार असून तालुक्यातील मढी नंतर सर्वात मोठी यात्रा म्हणून या यात्रेकडे बघितले जाते. भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्या हस्ते मूर्तीला जलाभिषेक करून यात्रेला प्रारंभ होणार आहे. सर्वाधिक पशुहत्या होणाऱ्या यात्रेमध्ये यंदा पशुहत्येला पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

रविवारी यात्रेचा मुख्य दिवस असून भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री व देवस्थानचे मठाधिपती हनुमान महाराज शास्त्री यांच्या हस्ते नागदेवतेला जलाभिषेक होऊन कावडीने आणलेल्या पाण्याने भाविकांकडून मूर्तीला जलाभिषेक होणार आहे हजारो भाविक पैठण वरून कावडीने पाणी आणतात शनिवारी शालिनी इंदोरीकर रविवारी निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तन, सोमवारी कुस्त्यांचा हंगामा, लोकनाट्य तमाशा व लावण्यांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेत गैरप्रकार होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त



तैनात करण्यात आला आहे. यात्रेमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होते. संपूर्ण परिसर ऊस तोडणी कामगारांचा असल्याने खरीप हंगामासाठी लागणारी शेती अवजारे, स्टेशनरी, कटलरी, खेळणी व हलवाई व्यापारी मोठ्या प्रमाणावर परिसरातील दोन जिल्ह्यातून येतात.

राष्ट्रीय महामार्गावरील खरवंडी पासून पाच किलोमीटर अंतरावर मिडसांगवी नावाचे गाव आहे तेथून पुढे बीड जिल्ह्याची हद्द सुरू होते या यात्रेसाठी भटका समाज मोठ्या संख्येने येतो. स्थानिक बोली भाषेत याला विंचू काट्याचे देवस्थान म्हणूनही ओळखले जाते सर्व भटका समाज व भाविक येथे नागदेवतेचे दर्शन घेतात. येथील यात्रेनंतरच परिसरातील शेतकरी खरीप हंगामासाठी शेतीच्या मशागतीची कामे सुरु करतात. काही दिवसांपूर्वी देवाला नैवेद्यासाठी म्हणून बकरी, कोंबड्या बळी दिल्या जात. परंतु संत भगवान बाबाच्या पुढाकाराने येथील बळी प्रथा बंद झाली असून पुरणपोळीचा नैवेद्य देवतेला अर्पण करण्यात येतो. संत भगवान बाबा त्यांचे नंतर स्वर्गीय भीमसिंह महाराज व आता मठाधिपती डॉ. नामदेव शास्त्री हे या गावच्या व परिसराच्या गुरुस्थानी असल्याने भगवानगडावरील ज्ञानेश्वरी विद्यापीठातील विद्यार्थी असणारे हनुमान सातपुते महाराज यांची मठाधिपती म्हणून गेल्या आठ वर्षांपासून नियुक्ती करण्यात आली आहे.

आज तहसील कार्यालयमध्ये प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांना देवस्थान समिती व विश्व हिंदू परिषदेतर्फे कुठल्याही प्रकारे मांसाहार यात्रेत होऊ नये भाविकांनी व ग्रामस्थांनी यात्रेच्या तीन दिवसांमध्ये पशुहत्येला बंदी घातली आहे असे निवेदन दिले असून त्यासाठी आवश्यक तो बंदोबस्त मिळावा अशी विनंती निवेदनाद्वारे केली आहे.

# संजीवनी पॉलीटेक्निकच्या मेकॅट्रॉनिक्स विभागाला एनबीए मानांकन : अमित कोल्हे

### मेकॅट्रॉनिक्स विभाग ठरला महाराष्ट्रातील पहिला आणि एकमेव एनबीए मानांकित विभाग

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्निकच्या मेकॅट्रॉनिक्स विभागाचे नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडीटेशन (एनबीए), नवी दिल्लीने आऊटकम बेस्ड एज्युकेशन निकषांनुसार मुल्यांकन करून पुढील तीन वर्षांसाठी मानांकन बहाल केले. संजीवनी पॉलीटेक्निकने शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नित मेकॅट्रॉनिक्स ही ब्रंच महाराष्ट्रात सर्वात प्रथम सुरू केली होती. यामुळे हा विभाग महाराष्ट्रात एनबीए मानांकन प्राप्त करणारा पहिला व एकमेव ठरला आहे. आता या पॉलीटेक्निकचे सर्व विभाग एनबीए हे सर्वोच्च मानांकन प्राप्त विभाग ठरले आहे, अशी माहिती संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री. अमित कोल्हे यांनी दिली आहे.

संजीवनी पॉलीटेक्निकच्या या अभुतपुर्व उपलब्धीबाबत संजीवनीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी चिफ टेक्निकल ऑफिसर विजय नायडू, प्राचार्य ए. आर. मिरीकर, प्रशासकीय अधिकारी प्रकाश जाधव, एनबीए समन्वयक डॉ. के. पी. जाधव, विभाग प्रमुख प्रा. आय. के. सय्यद, राजिस्ट्रार नानासाहेब लोंढे, विभागीय समन्वयक प्रा. आर. बी. शिंदे, इतर सर्व विभाग प्रमुख व डीन्स यांचे अभिनंदन करून श्री नितिनदादा कोल्हे यांनी या सर्वांचा छोटेखानी कार्यक्रमात सत्कार केला.

पत्रकात अमित कोल्हे यांनी म्हटले आहे की, माजी मंत्री व संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष कै. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०१६ मध्ये प्रथमतः हे पॉलीटेक्निक मुल्यांकनासाठी सामोरे गेले तेव्हापासुन एनबीएच्या कसोटीला सामोरे जाणारे संजीवनी पॉलीटेक्निक हे महाराष्ट्रातील फार कमी संस्थापैकी एक आहे. मेकॅट्रॉनिक्स विभाग २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासुन सुरू झाला. त्यामुळे एनबीए मानांकनाच्या कसोटीस पात्र होताच आता या विभागाने मुल्यांकन करून घेवुन एनबीए मानांकन प्राप्त केले.

एनबीए मानांकन प्राप्त मेकॅट्रॉनिक्स विभागातील मागील तीन वर्षातील प्रवेश संख्या, उच्च विद्याविभूषित व अनुभवी असणारे शिक्षक, विद्यार्थी-शिक्षक प्रमाण, प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या सलग तीन वर्षात उत्तिर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे वाढते प्रमाण, उच्च शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी आणि संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये मिळणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाण, शिक्षकांनी आधुनिक ज्ञानवृध्दीसाठी पुर्ण केलेले परीसंवाद, सादर केलेले शोधनिबंध व कार्यशाळांची संख्या, कन्सलटन्सी, विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेले प्राविण्य, सुसज्य प्रयोगशाळा, नामांकित कंपन्यांशी केलेले सामंजस्य करार, माजी विद्यार्थ्यांचे सध्या विविध कंपन्यांमधिल स्थान आणि संबधित कंपन्यांचा या विद्यार्थ्यांसंदर्भातील अभिप्राय, पालकांचा विभागासंदर्भातील अभिप्राय, अशा अनेक बाबींचा चढत्या कमानीचा अहवाल एनबीए कार्यालयाला सादर केला होता.



विशेष म्हणजे मागील तीन वर्षांमध्ये या विभागाच्या सर्व गरजु विद्यार्थ्यांना चांगल्या पॅकेजच्या नोकऱ्या नामांकित कंपन्यांमध्ये मिळवुन देण्यात आल्या, या उपलब्धीची एनबीए समितीने विशेष दखल घेतली. एनबीए कार्यपध्दतीनुसार एनबीए समितीने या विभागाने सादर केलेल्या सर्व बाबींची पुराव्यासहीत परीमानांनुसार पडताळणी केली आणि भेटीनंतर लागलीच एका महिन्यात या विभागाला पुढील तीन वर्षांसाठी एनबीए मानांकन बहाल केल्याबाबतचे अधिकृत पत्र दिले.

महाराष्ट्रातच नव्हे तर संपुर्ण देशात अनेक पॉलीटेक्निक आहेत. परंतु फार थोड्या संस्था एनबीएच्या कसोट्यांना सामोरे जाण्याचे धाडस करतात. मात्र महाराष्ट्राच्या ग्रामिण भागातुन आत्मविश्वासाच्या जोरावर २०१६ पासुन एनबीएच्या कसोट्यांना सामोरे जाण्याचे संजीवनी पॉलीटेक्निक धाडसी पावुल टाकित आहे. पुर्वीचे सिव्हिल, मेकॅनिकल, कॉम्प्युटर व इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग आणि मेकॅट्रॉनिक्स विभाग एनबीए मानांकन प्राप्त झाले आहे. सध्या आवुटकम बेस्ड एज्युकेशनच्या माणकाप्रमाणे तपासणी करण्यात येते. अतिशय कठीण मानके असलेल्या कसोट्यांना हा विभाग सामोरे गेला. आता या विभागाने दर्जा व गुणवत्ता टिकवुन ठेवत तीन वर्षांसाठी एनबीए मानांकन प्राप्त करून संजीवनीच्या शिरेपेचात मानाचा तुरा खोवला आहे, असे श्री. कोल्हे यांनी शेवटी म्हटले आहे.

वीरभूमी

# पतसंस्थांच्या विविध प्रश्नांबाबतच्या बैठकीत सकारात्मक चर्चा

## मंत्रालयात सहकार मंत्र्यांसमवेत बैठक । पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांची माहिती

**● कोपरगाव । वीरभूमी–**
महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मंत्रालयात बोलाविलेल्या राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या विविध प्रश्नांबाबतच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय राज्यातील सहकारी पतसंस्था चळवळ सक्षम व सुदृढ होण्यासाठी झाले असल्याचे महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी सांगितले.

या बैठकीला नागपूरचे विधानसभा आमदार कृष्णाजी खोपडे, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सहकार आयुक्त दिपक तावरे, अपर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, सहकार खात्याचे निबंधक मिलिंद सोबले आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राज्य फेडरेशनचे संस्थापक वसंतराव शिंदे, उपाध्यक्ष शांतीलाल शिंगी, संचालक चंद्रकांत वंजारी, सर्जे राव शिंदे, राजाभाऊ देशमुख, कार्यकारी संचालिका सुरेखा लवांडे आदी उपस्थित होते.

अधिक माहिती देताना राज्य फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे म्हणाले की, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या ठेवींना संरक्षण देण्यासाठी जाहीर केलेली अंशदानाची योजना अव्यवहार्य असल्यामुळे ती रद्द करावी, अशी मागणी केली. आरोग्यमंत्र्यांनी केलेल्या मागणीला उत्तर देताना सहकार आयुक्त दिपक तावरे म्हणाले की, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची मागणी आणि राज्य फेडरेशनने बैठकीत निदर्शनास आणून दिलेल्या विविध मुद्द्यांमुळे आम्ही राज्यातील सहकारी पतसंस्थांकडून अंशदान घेण्याबाबत फेरविचार करणार आहे. सध्या राज्यातील सहकारी पतसंस्थांनी अंशदान द्यावे, यासाठी आग्रही राहणार नाही.

सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या बाबतच्या या सकारात्मक निर्णयाबद्दल महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था चळवळीमध्ये समाधान, आनंद व उत्साहाचे वातावरण पसरलेले आहे. तसेच या बैठकीमध्ये पतसंस्थांच्या विविध विषयांवर चर्चा झाली. विशेषतः सहकार खात्याकडून १०१ चे दाखले तातडीने दिले जावेत. अपसेट प्राईसचे प्रस्ताव तातडीने मंजूर केले जावेत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून थकीत कर्जदारांच्या मालमत्तेचे ताबे त्वरीत दिले जावे. या विषयांबाबत देखील सहकार खाते परिपत्रक काढणार असल्याचे सांगितले.

थकीत थकबाकीदाराची मालमत्ता जप्त केल्यानंतर सहकार खात्याकडून अपसेट प्राईस मंजूर करून घ्यावी लागते. ही प्रक्रिया थकबाकीदारांना मान्य होत नाही. यावर उपाय म्हणून थकबाकीदारांनी मागणी केलेल्या १ महिन्याच्या आत मालमत्ता विकण्याची परवानगी द्यावी. परंतु थकबाकीदाराला अपेक्षित असलेल्या किमतीत मालमत्ता विकली न गेल्यास सहकारी पतसंस्थांनी मागणी केलेल्या किमतीत अपसेट प्राईस देता यावी. अशा प्रकारचा निर्णय देखील यावेळी घेण्यात आला.



तसेच राज्यातील सहकारी पतसंस्थांनी सोने तारण कर्ज वाढवावे. कारण हे सोने तारण कर्ज जगात अति सुरक्षित आहे. तारण असलेले सोने हे पतसंस्थांच्या ताब्यात असते. त्यामुळे सोने तारण कर्जाच्या वसुलीची हमी सहकारी पतसंस्थांना मिळते. त्यामुळे सोने तारण कर्ज वाढीवर पतसंस्थांनी भर द्यावा.असे आग्रही प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी या प्रसंगी केले. तसेच सहकारी पतसंस्थांना विशेषत: महिला बचत गटाच्या वस्तू विक्री करून देण्याची परवानगी दिली असल्याचे यावेळी मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जाहीर केले.

या बैठकी विषयी अधिक माहिती देताना राज्य फेडरेशन उपाध्यक्ष शांतीलाल शिंगी म्हणाले की, सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांसमोर बाजू मांडताना सहकार मंत्री देखील पतसंस्थांच्या बाजूने आग्रही होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील देखील एका पतसंस्थेचे चेअरमन असल्यामुळे राज्यातील सहकारी पतसंस्थेचे सर्व प्रश्न निश्चितपणे मार्गी लागतील अशी अपेक्षा आहे. राज्य फेडरेशनने तयार केलेली क्रास प्रणाली सक्तीची करावी. या मागणीबाबत देखील या बैठकीत एकमत झाले आहे. तसेच सहकार खात्याने गत वर्षी काही सहकारी पतसंस्थांना कमकुवत संस्था म्हणून घोषित केले होते. हा निर्णय देखील रद्द करण्यात आला आहे.

तसेच पतसंस्थांचे अंशतः नियंत्रण महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनकडे देण्याबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन या बैठकीत दिसून आला. यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनने लेखा परिक्षकांचे पॅनल तयार करावे. त्यांच्याद्वारा निवडक सहकारी संस्थांची तपासणी केली जाईल व ते रिपोर्ट राज्य फेडरेशनकडे सादर केले जातील. राज्य फेडरेशनने यावर सहकार खात्याकडे अहवाल सादर करावा. या अहवालानुसार सहकारी पतसंस्थांवर कारवाई केली जाईल. असा देखील निर्णय या बैठकीत झाला असल्याची माहिती राज्य फेडरेशनचे संस्थापक वसंतराव शिंदे यांनी दिली.

प्रसंगी नागपूरचे आमदार कृष्णाजी खोपडे यांनी या प्रसंगी सहकार खात्यात चालणाऱ्या भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठविला. या वेळी सहकार खात्यातील भ्रष्टाचाराला आळा बसविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले.

> गत ३ वर्षात अंशदान भरण्याबाबत सहकार खात्याने तब्बल ५ परिपत्रके काढली होती. परंतु राज्य फेडरेशनच्या संमतीशिवाय आम्ही अंशदान देणार नाही असा निर्णय राज्यातील सहकारी पतसंस्थांनी घेतला होता. मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय सहकार खात्याला मागे घ्यावा लागला. हा राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या एकजुटीचा विजय आहे.
>
> – **काका कोयटे,** अध्यक्ष

सहकार आयुक्तांनी राज्यातील सहकारी पतसंस्थांकडे सहानुभूतीच्या नजरेने पाहावे. पतसंस्था चळवळ ही महाराष्ट्रातील सर्व सामान्य माणसांपर्यंत जाऊन पोहोचलेली आहे. विशेषत: शासकीय हमी असलेल्या कर्जाचे वाटप पतसंस्थांमार्फत करण्यात यावी, ही मागणी कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरीचे आमदार व विद्यमान आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या आग्रहावरून संमती देण्यात आली असल्याचे राज्य फेडरेशनच्या कार्यकारी संचालिका सौ सुरेखा लवांडे यांनी सांगितले.

राधानगरीचे आमदार व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनी राज्यातील सहकारी पतसंस्थांची बाजू प्रभावीपणे मांडल्याबद्दल राज्य फेडरेशनचे संचालक चंद्रकांत वंजारी यांनी त्यांचे आभार मानले.

# संजीवनी फार्मसी व सिनिअर कॉलेजच्या ३० विद्यार्थ्यांची हेटेरो फार्मा कंपनीत नोकरीसाठी निवड

**● कोपरगाव । वीरभूमी–**
संजीवनी बी. फार्मसी कॉलेज व संजीवनी आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (सिनिअर कॉलेज) च्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने काही दिवसांपुर्वी हैदराबाद येथील हेटेरो फार्मा या औषध निर्माण कंपनीचे कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले होते. त्यानुसार कंपनीच्या प्रतिनिधिंनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतींचा निकाल कंपनीने नुकताच जाहीर केला असुन यात एकुण ३० विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड केल्याचे अधिकृत पत्र दिले. यावरून संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित सर्वच पदवी व पदवीका शिक्षण देणाऱ्या संस्था ग्रामीण विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळवुन देण्यात आघाडीवर असल्याचे अधोरेखित होते, अशी माहिती दोनही महाविद्यालयांच्या वतीने संयुक्त पत्रकाद्वारे दिली आहे.

हेटेरो फार्मा या १४० पेक्षा अधिक देशात विस्तार असणाऱ्या कंपनीने बी. फार्मसी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील आकांक्षा कस्तुरे, यश बागुल, सारीका भोसले, निकिता दीहातोंडे, गौरव धावडे, ऋतुजा गायकवाड, प्रियंका गमे, प्रज्वल खंडागळे, मोहम्मद सरफराज अस्लम, कांचन नाईक, नितिन येवले, सोमनाथ गोसावी, श्रीजीत पांढवले, सिनिअर कॉलेजच्या ऋतुजा बनकर, सौरभ देवकर, सुमित देवकर, श्रुती देवकर, षंकर डोंगरे, संकेत गव्हाणे, वैभव माळी, प्राजक्ता तुरकणे, चंद्रकांत रहाणे, गणेश सालकडे, वैष्णवी शिंदे, प्रविण सिनगर, दर्शन तांबे, राघवेंद्र तिडके, राहुल कदम, अजिंक्य वाघ व सिध्दार्थ पवार यांची निवड केली आहे.

अशा प्रकारे संजीवनीच्या सर्वंच संस्था नामांकित कंपन्यांच्या सपर्कात राहुन कंपन्याना काय ज्ञान अभिप्रेत आहे, ते आपल्या विद्यार्थ्यांना देत असतात, त्यामुळे गामिण भागातील युवक युवतींच्या हाताला चांगला रोजगार मिळत आहे. यामुळे पालक वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा श्रीगोंदा तालुका मुस्लिम समाजाच्या वतीने तीव्र निषेध

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
काश्मीर येथील पहलगाम येथे आतंकवादी हल्ल्यात निष्पाप पर्यटकांची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा मुस्लिम समाजाच्या शेकडो नागरिकांनी एकत्र येऊन शांततेच्या मार्गाने तहसील कार्यालयात निषेध व्यक्त केला. यावेळी तहसीलदार प्रवीण मुदगल यांना निवेदन देण्यात आले.



यासमयी झालेल्या सभेत सामाजिक कार्यकर्ते झहीरभाई जकाते, अरविंद कापसे, मौलाना आतार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी व समाजामध्ये बंधुभाव व शांततेचा संदेश दिला.

निषेध सभेला नगरसेवक निसार बेपारी, वसीमभाई ताडे, आसिफ पठाण, डॉ. जमादार, समीर काझी, रिजवानभाई जमादार, मौलाना रहीम जकाते, मुद्दसर मालजप्ते, सोहेल शेख, शहानवाज इनामदार, राजू पठाण, सद्दाम शेख, आतिफ शेख, मुसा मालजप्ते, इम्तियाज ताडे, फिरोज जकाते, इलियास पठाण व इतर मुस्लिम समाजातील मान्यवर पस्थिती होते.

मुस्लिम समाजाच्या वतीने सरकारकडे मागणी करण्यात आली की, अशा प्रकारच्या घटनांवर कठोर कारवाई करून दोषींना कडक शिक्षा द्यावी व देशात शांतता व एकोपा अबाधित ठेवावा. भविष्यात अशा घटना घडू नये म्हणून सरकारने योग्य ती खबरदारी घ्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

# विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद पालकाएवढाच शिक्षकांनाही असतो

## प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ । युपीएससी परीक्षेत यश मिळवल्याबद्दल सौरव ढाकणे यांचा काकडे विद्यालयात सत्कार

**● शेवगाव । वीरभूमी–**
विद्यार्थ्यांच्या यशात पालकांना जेवढा आनंद होतो तेवढाच आनंद गुरूजनांना होत असतो. आपल्या शाळेचे माजी विद्यार्थी सौरव ढाकणे यांनी युपीएससी परीक्षेत मिळवलेले यश कौतुकास्पद आहे. पर्वताएवढे यश खेचून आणले याचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याचे सांगत आपण आपल्या प्रशासकीय क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगती करत राहावे, अशा शुभेच्छा आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी दिल्या.

येथील आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी सौरव राजेंद्र ढाकणे याने यू.पी.एस.सी. परीक्षेत ६२८ वी रँक प्राप्त करत घवघवीत यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या यशाबद्दल सौरव ढाकणे यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन डॉ. बिटाळ होते.



यावेळी संस्थेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, सौरवचे वडील सेवानिवृत्त केंद्रप्रमुख राजेंद्र कारभारी ढाकणे, विद्यालयाचे प्राचार्य संपतराव दसपुते, उपप्राचार्या रूपा खेडकर, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, हरिश्चंद्र मडके, शिवाजी पोटभरे, प्रकाश दहिफळे, भालसिंग मॅडम, शेलार सर, चेमटे सर, भागवत सर, जाधव सर, गायकवाड सर, टाकळकर सर, झरेकर सर, नन्नवरे सर, पिसोटे सर, व्यवहारे सर, खोले सर, वाणी सर, जवरे मॅडम, शहाणे मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी अविनाश भागवत म्हणाले, विद्यार्थी यशस्वी झाला तर त्याचा फायदा शाळेला व सर्वांनाच होत असतो. तो एक क्षण शिक्षकासाठी उत्साही व प्रेरणादायी असतो.

सत्काराला उत्तर देतांना सौरव ढाकणे म्हणाले, शाळेने केलेला सत्कार हा सर्वात जिव्हाळ्याचा सत्कार आहे. माझ्या यशात माझे पालक व माझ्या गुरुजनांचा सिंहाचा वाटा आहे. आज मुलांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना चांगले मित्र असावेत, भरपूर कष्ट करा, अभ्यास करा, वर्तमानपत्र वाचा, त्याचबरोबर टेक्नॉलॉजीवर फोकस करा. सोशल मीडियाचा वापर कमी करा तसेच ध्येय ठरवून मेहनत केल्याने यश हमखास मिळते, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोविंद वाणी यांनी केले. यावेळी त्यांनी सौरवच्या जीवनातील आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतिमा उकिर्डे यांनी केले तर प्रा. सविता फाटके यांनी आभार मानले.

# दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्यांना कौटुंबिक न्यायालयात श्रद्धांजली

**● पाथर्डी । वीरभूमी–**
आपला मुलगा चुलतीसोबत भांडत असतांना पाहुन मुलाला भांडण करु नका असे समजून सांगणाऱ्या ८० वर्षे वयाच्या वृद्ध बापाला पोटच्या मुलाने लाथाने मारहाण केली. तसेच ७५ वर्षाची वृद्ध आई मध्ये पडली असता तिलाही सुनेने ढकलुन देवुन जखमी केले. ही घटना पाथर्डी तालुक्यातील मांडवे येथे घडली. याप्रकरणी वृद्ध दांम्पत्याच्या तक्रारीवरुन पाथर्डी पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाथर्डी तालुक्यातील मांडवा येथील श्रीपती गावडे हे पत्नी, मुलगा, सूने सोबत राहतात. त्यांना दोन मुले व तीन मुली आहेत. त्यांचा मुलगा गोरख गावडे याने यापुर्वीही आई, वडीलांना शिवीगाळ केलेली आहे. बुधवारी सायंकाळी सहा वाजता गोरख गावडे हा त्याच्या चुलती इंदुबाई गावडे यांच्यासोबत भांडत होता. त्याला समजावुन सांगण्यासाठी श्रीपती गावडे गेले असता मुलाने वडीलांना शिवीगाळ करुन लाथा बुक्याने मारहाण केली. हे पाहुन वृद्ध आई मध्ये आली तर तिलाही सुन मिरा गावडे हिने लोटुन देवुन खाली पाडले. वृद्ध महीलेचे दोन वेळा ह्रदयाचे ऑपरेशन झालेले आहे. अशा अवस्थेतही तिला मारहाण करण्यात आली. पाथर्डी पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल केल्यानंतर श्रीपती गावडे यांनी सागितले की, मुलगा गोरक्ष मला सतत मारहाण करतो. माझ्या वृद्ध पत्नीला देखील मारहाण होते. मी मुलांना जमीन देखील दिलेली आहे. आता शेवटच्या काळात अवहेलना सहन होत नाही. तुम्हीच काही तरी करा अशी गयावया वृद्ध असलेले श्रीपती गावडे यांनी पोलिसांसमोर केली.